# सहा महिन्यांनंतर मेट्रो-३ धावणार चालकरहित ?

## प्रवाशांची मानसिकता आणि सुरक्षा प्रमाणपत्र महत्त्वाचे

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

कुलाबा-वांद्रे-सिप्झ मार्गावरील मेट्रो ट्रेन या मोटरमनशिवाय म्हणजे स्वयंचलित पद्धतीने चालवल्या जाणार आहेत. मात्र हे लगेचच शक्य होणार नाही. हा मार्ग सुरू झाल्यानंतर किमान सहा महिने तरी चालकच या ट्रेन चालवेल. त्यानंतर चालकाशिवाय मेट्रो चालवण्याचा विचार होऊ शकतो.

प्रवाशांची अनुकूल मानसिकता आणि रेल्वे सुरक्षा आयुक्तालयाची संमती यावर मोटरमनविरहित मेट्रो ही संकल्पना प्रत्यक्ष अस्तित्वात येईल.

मुळात चालकविरहित ट्रेन ही संकल्पना आपल्याकडे अजून तरी अस्तित्वात आलेली नाही. अशा प्रकारे ट्रेन चालवायची असेल तर आधी प्रवाशांच्या मानसिकतेचा विचार करावा लागेल. चालकविरहित ट्रेन मधून प्रवास करणे खरेच सुरक्षित आहे का, याची खात्री प्रवाशांना पटणे आवश्यक आहे. प्रवासी लगेचच या प्रवासाला पसंती देतील का, हे पाहावे लागेल.



● सध्या मेट्रो-३ च्या ताफ्यात तीन ट्रेन आल्या आहेत. या ट्रेनच्या चाचण्या पार पडल्या आहेत.चालकाशिवायही या ट्रेन चालवता येतात, अशा तंत्रज्ञानाचा त्यात वापर करण्यात आला आहे.

सुरक्षेविषयी प्रवाशांना खात्री पटल्यानंतरच मेट्रो चालकाशिवाय चालवता येईल, असे मेट्रो-३ च्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

/...२

## सहा महिन्यांनंतर मेट्रो-३ धावणार चालकरहीत?

चालक विरहीत ट्रेन चालवण्यासाठी किमान सहा महिने ट्रेनच्या त्या धर्तीवर चाचण्या घ्याव्या लागतील.

रेल्वे सुरक्षा मंत्रालयाचे सुरक्षा विषयक प्रमाणपत्र मिळवणे हा या प्रक्रियेतील महत्वाचा भाग आहे. चालकासह ट्रेन चालवण्याचे प्रमाणपत्र मिळण्यास फारसा विलंब लागत नाही. मात्र चालक विरहीत ट्रेन प्रवासी सेवेकरिता वापरण्याकरिता अनेक चाचण्या द्याव्या लागणार आहेत. संपूर्ण सुरक्षेची खात्री पटल्यानंतरच हे प्रमाणपत्र मिळू शकते.

मेट्रो २-आणि ७ या मार्गावरील ट्रेन या चालक चालवतात. मेट्रो ३ हा भविष्यात कदाचित चालक विरहीत ट्रेन धावणारा पहिला मार्ग असू शकतो. बहुधा या मार्गाच्या पहिल्या टप्प्यातच हा प्रयोग होण्याची शक्यता आहे.